# प्रेसनोट ता. ०२/०८/२०२२

# महीलांचे गळयातील चेन स्नॅचींग व मोबाईलची जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला हिंजवडी पोलीसांनी केले गजाआड

चेन चोरीच्या वाढत्या गुन्हयाचे अनुषंगाने मा.अंकुश शिंदे सो, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मा.डॉ.विवेक मुगळीकर सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिंजवडी पोलीस ठाणे पिं.चिं.यांनी हिंजवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना चैन चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेकरीता व त्यास प्रतिबंध करण्याबाबत सुचना केल्या असता त्यानुसार दिनांक २९/०७/२०२२ रोजी तपास पथकातील पोलीस हवालदार ३९४ धुमाळ, पोलीस हवालदार ९५८ कुदळ व पोलीस नाईक १९०० चव्हाण असे हिंजवडी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत फिरत असताना **पोलीस नाईक १९०० श्रीकांत चव्हाण** यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, हिंजवडी पोलीस ठाणेकडील मोबाईल चोरीतील रेकॉर्डवरील गुन्हागार आकाश राठोड याने म्हाळुंगे येथुन मोबाईल चोरी केला असुन त्याने तीन ते चार दिवसांपुर्वी पिंपरी चिंचवड परिसरात चैन चोरीचे गुन्हे केले आहेत. व तो पुन्हा मारुंजी रोड हिंजवडी परिसरात चैन चोरी करण्यासाठी येणार आहे. बातमीच्या अनुषंगाने तपास पथकातील सहा. पोलीस निरीक्षक सागर काटे, पोलीस हवालदार ३९४ धुमाळ, पोलीस हवालदार ९५८ कुदळ, पोलीस नाईक १९०० चव्हाण पोलीस नाईक १५७६ नरळे, व पोलीस शिपाई १९७७ राणे असे मारुंजी रोड लक्ष्मी चौक हिंजवडी पुणे येथे सापळा लावुन थांबले असता रेकॉर्डवरील आरोपी आकाश राठोड हा शाईन मोटार सायकलवरुन संशयीतरित्या फिरताना दिसला असता त्यास शिताफीने ताब्यात घेवुन त्यास त्याचा नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव व पत्ता **आकाश वजीर राठोड वय २२ वर्षे रा. मु.पो. मुलखेड ता. मुळशी जि.पुणे** असे असल्याचे सांगितले. त्यास ताब्यात घेवुन पोलीस ठाणे येथे आणुन त्याचेकडे अधिक तपास करता त्याने त्याने हिंजवडी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. ६६४/२०२२ भा. द. वि. कलम ३९२ मधील दोन मोबाईल जबरदस्तीने चोरल्याचे निष्पन्न झालेने त्यास दाखल गुन्हयात अटक करुन त्याची पोलीस कोठडी रिमांड घेवुन पोलीस कोठडी रिमांडमध्ये त्याने जबरी मोबाईल चोरीचे व चैन चोरीचे खालील गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

१)हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नं.६६४/२०२२ भा.द.वि.कलम ३९२ प्रमाणे.
२)हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नं.७०९/२०२२ भा.द.वि.कलम ३९३ प्रमाणे.
३)वाकड पोलीस ठाणे गु.र.नं.६४९/२०२२ भा.द.वि.कलम ३९२ प्रमाणे.
४)चिखली पोलीस ठाणे गु.र.नं.३८९/२०२२ भा.द.वि.कलम ३९२ प्रमाणे

त्याचेकडुन वरील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणुन **एकुण ७ मोबाईल फोन व दोन सोन्याचे मंगळसुत्र असा एकुण १,६८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

सदरची कारवाई मा.अंकुश शिंदे सो,पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा.डॉ संजय शिंदे सो, अप्पर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड,मा.आनंद भोईटे सो, पोलीस उपआयुक्त परि-२ पिंपरी चिंचवड, मा.श्रीकांत डिसले सो, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग वाकड, यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस स्टेशनचे डॉ.विवेक मुगळीकर सो,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सुनिल दहिफळे सो, पोलीस निरीक्षक(गुन्हे),सोन्याबापु देशमुख सो, पोलीस निरीक्षक(गुन्हे)तपास पथकाचे प्रमुख सपोनि सागर काटे स.पो.नि.राम गोमारे, सहा.पो.उप-निरिक्षक बंडु मारणे, बाळकृष्ण शिंदे, पोलीस हवालदार बापु धुमाळ, विक्रम कुदळ, कैलास केंगले, पोलीस नाईक श्रीकांत चव्हाण, अरुण नरळे, रितेश कोळी, चंद्रकांत गडदे, पोलीस शिपाई कारभारी पालवे, ओमप्रकाश कांबळे, अमर राणे, दत्ता शिंदे,मा.पोलीस उपआयुक्त सो.परि२ कार्यालयाकडील पोलीस उप निरीक्षक पवार व पोलीस शिपाई पंडीत यांनी केली आहे.

**(आनंद भोईटे)**
**पोलीस उप-आयुक्त परि-२,**
**पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड,**